स्थायी निदेश ११-२०२३

**नगरपरिषद / नगरपंचायती मधील स्थानिक कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी व वेतन निश्चितीची पडताळणी कार्यपद्धती निश्चित करणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**

**नपप्रसं/प्र.क्र.१५/२०२३/स्थायी नि./११/२०२३/न.प.स्था.कर्म./सेवावि.बाबी/वेतन नि.पड. कार्य./कक्ष-१२/** 7003

**दिनांक** 15 DEC 2023

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती औद्योगीक नगरे अधिनियम १९६५ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक स्वायत्तता देण्यात आलेली असून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडील कर्मचा-यांचे वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन, अंशदाने व निवृत्ती वेतन विषयक लाभांच्या दायित्वांची जबाबदारी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर असल्याने वेतन व निवृत्ती वेतन विषयक खर्चाचा भार नगरपरिषद स्वनिधीवर पडतो. नगरपालिका, नगरपरिषदा यांना, जकात व स्थानिक संस्था करापोटी दिल्या जाणाऱ्या "सहाय्यक अनुदानातून" खर्च उद्दिष्टाच्या प्राधान्यक्रमानुसार, वेतन, निवृत्ती वेतनावर खर्च केला जातो. व त्यानंतर उर्वरित रक्कम विकास कामांसाठी वापरली जाते. नव्याने निर्माण होणाऱ्या नगरपरिषदा व नगरपंचायती यांना मंजूर आकृतीबंधानुसार वेतनावर होणारा खर्च विचारात घेऊन शासनाकडून सहायक अनुदान निश्चित केले जाते. नगरपरिषदा / नगरपंचायती या घटनात्मक स्थानिक स्वराज्य संस्था असून त्यांचा स्वनिधी व शासकीय अनुदाने यांचा त्यामुळे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून सुयोग्य वापर होणे आवश्यक आहे.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय व त्यांच्या अधिनस्त असलेले विभागस्तरावरील व जिल्हास्तरावरील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची शासन निर्णय वित्त विभाग दि. २२ डिसेंबर, १९८९ नुसार संचालक, लेखा व कोषागारे यांच्या आस्थापनेवर मुंबई, पुणे, नागपुर व औरंगाबाद या ठिकाणी प्रत्येकी एक "वेतन पडताळणी पथका" ची निर्मिती करण्यात आलेल्या पथकांकडून वेतन निश्चितीची पडताळणी केली जाते. तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे राज्यसेवा संवर्गातील राज्य शासकिय अधिकारी व कर्मचा-यांच्या बाबतीत संचालनालय, लेखा व कोषागार, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या जिल्हास्तरावरील संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा वेतन पडताळणी पथकाकडून राज्य शासनाने वेळोवेळी लागु केलेल्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार निर्गमित झालेल्या अधिसूचनांप्रमाणे वेतन निश्चितीची पडताळणी केली जाते. वेतन पडताळणी पथकाचे काम हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके, संबंधित विभागांची परिपत्रके व महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील नियमानुसार करण्यात येते.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील त्यांच्या आस्थापनेवर मंजूर कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीची पडताळणी करण्याकरिता सक्षम धोरण व यंत्रणा सद्यस्थितीत अस्तित्वात नाही. परिणामी, स्थानिक निधी लेखापरीक्षण कार्यालयाकडील वार्षिक संवैधानिक लेखापरिक्षणाअंती अनेक त्रुटी व वसुलपात्र रकमा आक्षेपित केल्या जातात. पर्यायाने वसुलपात्र रकमांच्या स्वरुपात मोठ्या प्रमाणात निधी गुंतून राहतो व वसुलीअंती निधी उपलब्ध होतो. वसुलपात्र रकमेमुळे निवृत्ती वेतन प्रकरणे प्रलंबित राहतात, अनेक वेळा सदोष सेवानिवृत्ती लाभाची निश्चिती केली जाते. त्यामुळे न्यायालायीन प्रकरणे, लोकायुक्त प्रकरणे उद्भवतात. पर्यायाने प्रकरणांवरील न्यायिक कार्यवाहीवर मोठ्या प्रमाणात स्वनिधी खर्च होतो. सार्वजनिक निधीचा अपव्यय टाळणे व त्यासाठी योग्य प्रशासकीय व्यवस्था निर्माण करणे त्यामुळे आवश्यक झाले आहे.

आदेश :-

१. नगरपरिषदा / नगरपंचायती येथे कार्यरत राज्य शासकीय अधिकरी व राज्य संवर्गातील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीच्या पडताळणीकरिता, विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालयांतर्गत मंजूर पदावर कार्यरत असणारे लेखापाल/लेखापरीक्षक, श्रेणी-अ / सहाय्यक आयुक्त (लेखा), लेखाविभागातील अधिकारी यांना त्या त्या महसुली विभागा अंतर्गतच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चिती पडताळणीचे निर्देश देण्यात येत आहे. ते यापुढे "सक्षम वेतन पडताळणी यंत्रणा" म्हणून वेतन पडताळणीचे कामकाज तात्काळ सुरु करतील.

२. विभागीय सह आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त असणारे सहाय्यक आयुक्त (लेखा) / लेखापाल/लेखापरीक्षक, श्रेणी-अ, लेखाविभागातील अधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र नागरी सेवा (से.नि.वे) नियम १९८२ मधील नियम १२१ ते १२६ नुसार व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक व विविध वेतन आयोगानुसार निश्चित व मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चितीची पडताळणी करून त्यांच्या शिफारशी नुसार परिशिष्ट-१ प्रमाणे प्रमाणपत्र द्यावे.

३. नगरपरिषद / नगरपंचायत व विभागीय सह आयुक्त यांनी नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चितीच्या पडताळणीकरिता पुढील प्रमाणे कार्यवाही करणे क्रमप्राप्त राहील.

१) मुख्याधिकारी हे प्रथम शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक व वेतन पडताळणी मार्गदर्शिका या अन्वये कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके सेवानिवृत्तीच्या किमान एक वर्ष अगोदर पर्यंत अद्यावत व परिपूर्ण करतील.

२) मुख्याधिकारी हे कर्मचाऱ्यांचे अद्यावत सेवापुस्तक, सेवानिवृत्तीस एक वर्ष शिल्लक राहिले असताना विभागीय सह आयुक्त कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय येथे पडताळणी करिता सादर करतील.

३) विभागीय सह आयुक्त कार्यालयात सेवापुस्तके सादर केल्यावर, लेखा विभागातील अधिकारी/कर्मचारी हे पुढील प्रमाणे प्राप्त लाभांचे व वेतननिश्चितीची पडताळणी करतील.

- थेट नियुक्तीने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रारंभिक मूळ वेतनाची पडताळणी
- पदोन्नतीने प्राप्त होणाऱ्या पदाची वेतननिश्चिती
- कालबद्ध, आश्वासित प्रगती योजना व सुधारित आश्वासित प्रगती योजनेंतर्गत प्राप्त लाभ व वेतननिश्चिती
- मर्यादित विभागीय परीक्षेच्या निवडीने होणारी वेतननिश्चिती
- वेतन पडताळणी मार्गदर्शिकेतील सर्व मुद्दे.

४. वेतननिश्चिती प्रकरणांची पडताळणी करताना काही त्रुटी, उणीवा, अपूर्णता आढळल्यास आक्षेप उपस्थित करतील. सदर आक्षेपांची पूर्तता करण्यासाठी वेतन पडताळणी करणारे अधिकारी सदरचे सेवापुस्तक संबंधित नगरपरिषद / नगरपंचायतीस परत पाठवतील किंवा आवश्यक असल्यास संबंधित नगरपालिकेकडून तात्काळ आक्षेपांची पूर्तता करून घेतील. (संबंधित मुख्याधिकारी यांनी आक्षेपांची पूर्तता करून १५ दिवसामध्ये सेवापुस्तक जमा करणे बंधनकारक राहील.)

५. प्रत्यक्ष सेवापुस्तक प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसामध्ये सदरच्या सेवापुस्तकाची पडताळणी करून विभागीय सह आयुक्त हे परिशिष्ट-१ मध्ये प्रमाणपत्र निर्गमित करतील किंवा आक्षेपांची पूर्तता करण्यासाठी सदरचे सेवापुस्तक संबंधित नगरपालिकेस परत करतील.

६. विभागीय सह आयुक्त हे कार्यालयामध्ये “वेतन पडताळणी कक्ष" या स्वतंत्र कार्यासनाची स्थापना करेल व वेतन पडताळणी कक्षा करिता स्वतंत्ररित्या विभागातील “अ” व “ब” नगरपरिषदांमधील लेखापरीक्षण व लेखा सेवा किंवा कर व प्रशासकीय सेवा या संवर्गातील २ कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात उसनवारी तत्वावर तात्काळ सेवा वर्ग करतील.

७. संचालनालय स्तरावरील कार्यसन ८ (ई गव्हर्नन्स) यांच्याकडून वेतन पडताळणी पथक, मुंबई यांचे करिता सेवापुस्तक पडताळणीसाठी अस्तित्वात असलेली संगणक प्रणालीच्या धर्तीवर स्वतंत्र “नगरपरिषद / नगरपंचायती कर्मचारी सेवापुस्तक पडताळणी प्रणाली” संगणक प्रणाली लवकरात लवकर विकसित करावी. भविष्यात याच संगणक प्रणालीच्या माध्यमातून संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक पडताळणी करिता प्रथम ऑनलाईन पद्धतीने विभागीय सह आयुक्त यांना सादर करतील व तदनंतर ३ दिवसांमध्ये परिपूर्ण प्रस्ताव मूळ सेवा पुस्तकासह विभागीय सह आयुक्त कार्यालय यांना सादर करतील.

८. संबंधित नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे विभागीय सह आयुक्त यांचे परिशिष्ट-१ मधील पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्याखेरीज निवृत्तीवेतन, उपदान व रजा रोखीकरण अदा करणार नाहीत. मुख्याधिकारी यांना सेवानिवृत्ती वेतन प्रकरण मंजूर करण्याकरिता विभागीय सह आयुक्त यांचे पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य राहील.

९. विभागीय सह आयुक्त यांच्या पडताळणी प्रमाणपत्रा विना निवृत्तीवेतन प्रकरण मंजूर केल्यास संबंधित नगरपालिकेचे मुख्याधिकारी व आस्थापना प्रमुख हे शिस्तभंग विषयक कार्यवाहीसाठी पात्र असतील.

१०. सदरचा स्थायी निदेश हा दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजी अथवा त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू राहील.

Manoj Vijay Ranade
Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2023.12.15 16:52:26 +05'30'

(मनोज रानडे-भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

प्रति,

१. विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
३. अध्यक्ष / प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
४. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. मा. प्रधान सचिव ( २ ), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. विभागीय आयुक्त , नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालये ( सर्व ).
३. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, सर्व विभाग.
५. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई ( सर्व कार्यासन ).
६. निवड नस्ती.

## परिशिष्ट-१

विभागीय सह आयुक्त,....... यांचे कार्यालय
"**वेतन** पडताळणी कक्ष"

**सेवा विषयक बाबी व वेतननिश्चिती पडताळणी प्रमाणपत्र**

१. नगरपरिषद / नगरपंचायतीचे नाव
२. कर्मचाऱ्याचे नाव
३. **नियुक्ती पदनाम व दिनांक**
४. **नियुक्तीची वेतनश्रेणी**
५. **सुधारित वेतन आयोगाची प्रारंभिक वेतननिश्चिती / पदोन्नतीने / सुधारित आश्वासित प्रगती योजना अंतर्गत / एकाकी पदाचा लाभ दिला असल्यास वेतनश्रेणी व दिनांक .....रोजी निश्चित केलेले मूळ वेतन. (सर्व आयोगांची व लाभांची )**
६. सेवानिवृत्ती पूर्वी प्राप्त होणारी अखेरची वेतनवाढ दिनांक व मूळ वेतन

वरील प्रमाणे सुधारित वेतन आयोगाची प्रारंभिक वेतननिश्चिती व लाभांची वेतननिश्चिती पडताळली व ती बरोबर आढळून आली आहे.

(अधिकारी यांचे नाव)
विभागीय सह आयुक्त
विभागीय आयुक्त कार्यालय,.........